# ऋणनिर्देश

पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य विद्याशाखांतर्गत सहकार आणि ग्रामीण विकास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्. डी.) पदवीसाठी सादर केलेल्या प्रबंधासाठी मला अनेक मान्यवर व्यक्तींचे मार्गदर्शन लाभले आहे. त्या सर्वांचे आभार मानणे माझे आद्यकर्तव्य आहे.

''सहकारी साखर उद्योग आणि आर्थिक व सामाजिक परिवर्तन - पुणे जिल्ह्यातील निवडक साखर कारखान्यांचा अभ्यास'' हा शोध प्रबंध तयार करताना माझे मार्गदर्शक आदरणीय गुरुवर्य प्रा. डॉ. एच. एम. जरे यांचे योग्य असे मार्गदर्शन आणि क्रियाशील सहकार्य लाभले. त्याबद्दल मी त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो व सदैव त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करतो.

वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, माजी अधिष्ठाता, प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, मानस, नीती व समाजविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. गौतम भोंग, सहकार आणि ग्रामीण विकास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एस. खैरनार, डॉ. एस. व्ही. कडवेकर तसेच वाणिज्य विभागप्रमुख डॉ. संजय कप्तान यांनी प्रबंध पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व योग्य सल्ला दिल्याबद्दल मी त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो.

पुणे जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर, इस्टेट मॅनेजर, शेतकी अधिकारी, ट्रान्सपोर्ट अधिकारी, साखर शाळेतील शिक्षक, ऊसतोडणी मजूर व मुकादम यांच्यासंदर्भात माहिती मिळवित असताना योग्य ती मदत केली. त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी उपयुक्त माहिती उपलब्ध करून देणारे जयकर ग्रंथालयातील ग्रंथपाल तसेच सौ. वानले मॅडम, वाणिज्य विभागातील महादेव पवार, लोखंडे मामा, अवघडे सर, वाणिज्य विभागातील ग्रंथपाल, गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या धनंजय गाडगीळ ग्रंथालयाचे कर्मचारी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट ग्रंथालय, मांजरी, पुणे येथील पठाण सर, साखर संकुलमधिल अधिकारी, महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठातील ग्रंथपाल, मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड व शिवाजीनगर, महाराष्ट्र शासनाचा सहकार विभाग, जिल्हा माहिती केंद्र पुणे जिल्हा सहकारी बोर्ड, वैकुंठ मेहता राष्ट्रीय संशोधन संस्था पुणे, राज्यांतील सहकारी साखर संघातील अधिकारी, साखरशाळा चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्था यातील अधिकारी व संबंधित व्यक्ती यांनी योग्य ती सर्व मदत केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

संशोधन अभ्यासासाठी निवडक सहकारी साखर कारखाने, त्यांचे अधिकारी व कामगार, सभासद शेतकरी, कारखान्यांतील कामय कामगार, ऊसतोडणी मजूर यांच्या प्रत्यक्ष भेटी प्रश्नावली आणि चर्चेच्या माध्यमातून मोलाची माहिती मिळाली त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी सर्व शेतकरी बंधूंचा ऋणी आहे. आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ, घोडेगाव या संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलासशेठ गजानन काळे व श्री. अभिमन्यु काळे (अतिरिक्त कमिशनर), बी.डी. काळे महाविद्यालयाचे उप-प्राचार्य आणि माझे स्नेही मा.डॉ.श्री. पांडुरंग मुळूक सर तसेच माझे मित्र डॉ. पंकज अहिरे यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे येथील सर्व सहकारी शिक्षक, कर्मचारी, सेवकवर्ग यांचे विशेष आभार. श्री. विदुराजी नवले साहेब, श्री. ज्ञानेश्वर लांडगे (महापौर), श्री. नानासाहेब टाकळकर, तसेच माझे स्नेही प्राचार्य डॉ.जे.डी. टाकळकर, प्राचार्य डॉ. डी.डी. बाळसराफ, प्राचार्य डॉ. मुकूंद तापकीर, प्रा. शंकर वाजगे (नारायणगाव), श्री. एन. पी. गोपाळे सर, प्रा. बोरकर (चार्टर्ड अकौंटट), डॉ. गंगाधर सातव, डॉ. एम.एम. जाधव (जुन्नर) तसेच डॉ. निलेश दांगट, प्रा. प्रकाश चौधरी यांचाही आभारी आहे.

माझे परमपुज्य वडिल कै. श्री. बबनराव लक्ष्मणराव काळे, सेवानिवृत्त (शेती विकास अधिकारी), माझी परमपुज्य मातोश्री कै. नर्मदाबाई बबनराव काळे यांच्या आशिर्वादाने मी हे संशोधन कार्य पूर्ण करू शकलो. तसेच माझे मेव्हणे कै. डॉ. आनंद हुले (नारोडी), कै. शिवाजीराव जाधव (नांदूर), कै. आनंद वाबळे (कृषी अधिकारी) वडगांव सहानी तसेच श्री. दिलीपराव मेदगे (जावई) यांच्या प्रेरणेने व प्रोत्साहाने संशोधन कार्य पूर्णत्वास आले.

माझे पितृतूल्य जेष्ठ बंधू श्री. चंद्रकांत काळे व सौ. ललिता काळे यांच्या आशिर्वादाने आणि धाकटे बंधु श्री. प्रभाकर काळे यांनी घरची कौटुंबिक जबाबदारी सांभाळल्यामुळे मला संशोधन कार्यासाठी वेळ देता आला. इतर बंधुनी डॉ. महेश काळे, श्री. बाबासाहेब काळे (सी.अे. डोंबविली, मुंबई) श्री. दिलीप काळे, श्री. राजन काळे, श्री. भास्कर काळे श्री. संजय काळे, श्री. मनोज काळे (सरपंच), श्री. शिवकुमार काळे यांनी प्राथमिक माहिती संकलित करण्यास मदत केली. डॉ. योगेश काळे, डॉ. भारती काळे, माझे जेष्ठ चिरंजीव श्री. अभिजित काळे, सून सौ. वंदना काळे, कनिष्ठ चिरंजीव डॉ. अमित काळे व माझा नातू कु. अर्णव काळे यांनी पुण्यातील सर्व कुटुंबाची जबाबदारी सांभाळून सर्व प्रकारे माहिती गोळा करण्यास मदत केली. श्री. बाबुराव ल. काळे (चुलते) शेती विषयक बहुमूल्य मार्गदर्शन केले. माझे स्नेही प्रसिद्ध बिल्डर्स व प्रमोटर

भंडारी असोसिएटचे मालक श्री. रिकबशेठ भंडारी (मंचर) पुणे व श्री. सुरेशशेठ होनराव, प्रसिद्ध कापड व्यापारी (घोडेगांव) यांचे विशेष आभार!

सौ. मंगल/स्वाती काळे माझी पत्नी आणि कन्या कु. सेजल काळे यांनीही घरामध्ये अभ्यासासाठी आवश्यक असणारे शांत वातावरण ठेवले तसेच सर्व भगिनींनी सहकार्य केले त्यामुळेच हे काम पूर्ण होऊ शकले म्हणून मी त्यांचाही ऋणी आहे.

सदर संशोधन प्रबंध टंकलेखनाचे काम विज्वास सोल्युशन्स, (मंचर- घोडेगाव) प्रोप्रा. श्री. भूषण नांगरे व श्री. प्रसाद नांगरे यांनी संपूर्ण प्रबंधाची जबाबदारी स्वीकारून टंकलिखित माहिती विशिष्ट साच्यामध्ये रचना करून दिली त्याबद्दल नांगरे कुटुंबीयाचा सदैव ऋणी राहीन.

विशेषत: सर्व काळे परिवारातील (मु. धोंडमाळ-पो. घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे) सर्व सदस्य व समस्त ग्रामस्त मंडळ, धोंडमाळ तसेच विशेषत: मा. श्री नामदार साहेब दिलीपरावजी वळसे पाटील आणि ह.भ.प. मा.श्री. पांडुरंग महाराज येवले यांचा सहकार्यामुळे मी हे संशोधन पूर्ण करू शकलो. तसेच शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्या ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य व मदत केली आहे व ज्यांच्या नावाचा येथे उल्लेख करावयाचा राहिला आहे, अशा सर्वांचा मी आभारी आहे.

ठिकाण : एप्रिल २०१४.　　　　　　　　　　　　(श्री. विजय बबनराव काळे)